क्र.जिपना/आरोग्य/स्था.६/सिआर-..../२०/2479
कार्यालय :- जिल्हा परिषद, नागपुर
सामान्य प्रशासन विभाग
दिनांक :- १५/७/ २०२०

**वाचा :**

१) ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र क्र.१२२/आस्था १४ दि.१५.०५.२०१४
२) ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन पत्र क्र.जिपब-४८१६/(प्र.क्र.१३८/१६)आस्था.१४ दि.२२.०४.२०१६
३) ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१७/ प्र.क्र.२२८/आस्था.१४ दि.०७.०३.२०१९
४) या कार्यालयाचे पत्र क्रमांक /आरोग्य /स्था६/ १६३० दिनांक २८/४/२०२०
**५) ग्राम विकास विभाग शासन पत्र क्रमांक/संकीर्ण/२०२०/प्रक्र२८२/आस्था१४ दिनांक ९ जुलै २०२०**
**६) मा. मु.का.अ यांचे पत्र क्रमांक जिपना/साप्रवि/स्था३/सीआर८/३५३५ दिनांक ९ जुलै २०२०**

**प रि प त्र क :**

उपोद्घातात नमुद शासन तरतुदीनुसार **सन-२०२० मध्ये** सर्वसाधारण **स्थानांतर** जि.प. नागपूर अंतर्गत आरोग्य विभागाकडून नियंत्रीत वर्ग -३ चे अनुक्रमे **१)आरोग्य पर्यवेक्षक २) आरोग्य सहायक(पुरुष) ३) आरोग्य सहायक(महीला) ४) आरोग्य सेवक(महीला) ५) आरोग्य सेवक (पुरुष) ६) औषध निर्माण अधिकारी ७) प्रयोगशाळा तंत्रज्ञ ८) कृष्ठरोग तंत्रज्ञ** या संवर्गातील एकाच मुख्यालयी **३ वर्ष व त्यापेक्षा अधिक सेवा** झालेल्या तसेच **आदिवासी क्षेत्रातंर्गत ३ वर्ष (अधिसुचित गाव घटक क्षेत्र)** व त्यापेक्षा अधिक सेवा झालेल्या विनंती बदली अर्ज सादर करणा-या विनंती बदली पात्र अधिकारी / कर्मचारी यांच्या संवर्ग निहाय तात्पुरती जेष्ठता यादया (कार्यरत सर्व कर्मचाऱ्यासह) संदर्भ क्र ६ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार या **सोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.**

उपरोक्त संवर्ग निहाय विनंती बदली कर्मचा-याचे वास्तव्य जेष्ठता यादया दर्शनी भागावर सुचना फलकावर प्रसिध्द करुन **संबधित अधिकारी / कर्मचारी** यांच्या **निदर्शनास आणुन देण्याची जबाबदारी जि.प. स्तरावर संबधित कार्यालय प्रमुख व तालूका स्तरावर संबधित गट / तालुका आरोग्य अधिकारी / वैदयकीय अधिकारी प्रा.आ.के (सर्व) यांचेवर सोपविण्यात** येत आहे, त्यांनी उक्त जेष्ठता यादी संबधित अधिकारी / कर्मचारी यांचा निदर्शनास आणुन त्याची लेखी पोंच कार्यालयीन अभिलेखात जतन करुन ठेवावी.

तसेच उपरोक्त संवर्ग निहाय विनंती बदली वास्तव्य जेष्ठता यादीवर संबधित अधिकारी / कर्मचारी यांचे आक्षेप असल्यास सदर्हु आक्षेप **दिनांक १६-७-२०२० सांय. ५:४५ पर्यंत जि.प. स्तरावर संबधित विभागास तथा तालूका स्तरावर गट विकास अधिकारी / तालुका आरोग्य अधिकारी / वैदयकीय अधिकारी प्रा.आ.के (सर्व) यांचे कार्यालयास स्विकारुन** त्याची नोंद वहीमध्ये नोंद घ्यावी. व त्यानुसार प्राप्त आक्षेपाची कार्यालयीन अभिलेखावरुन पडताळणी करुन आवश्यक अभिलेख तथा कार्यालय प्रमुखाचे स्वंयस्पष्ट अभिप्रायासह **दिनांक १७-७-२०२० ला सकाळी ११ :०० वाजता या कार्यालयास संबधित सहाय्यक प्रशासन अधिकारी व कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांनी सादर करावे.** विहीत मुदती नंतर प्राप्त आक्षेप विचारात घेतल्या जाणार नाही. याची जानिव संबधितास करुन दयावी.

तसेच उपरोक्त प्रमाणे विनंती बदली पात्र जेष्ठता यादी मध्ये त्यांचे कार्यालय / मुख्यालय अंतर्गत एकाच मुख्यालयी ३ वर्ष व त्यापेक्षा अधिक सेवा झालेल्या तसेच आदिवासी क्षेत्रातंर्गत ३ वर्ष व त्यापेक्षा अधिक सेवा झालेल्या ईच्छुक विनंती अर्ज केलेल्या बदली पात्र सर्व अधिकारी / कर्मचारी यांचा समावेश असल्याबाबत खातर जमा करावी व त्यामध्ये विनंती **बदली पात्र कर्मचाऱ्यांचे नांव वगळले असल्याचे वा काही बाबींची सुधारणा करण्याचे निदर्शनास आल्यास** संबधिताचे मुळ सेवा पुस्तकासह वरीलप्रमाणे यादीचे विवरण पत्रात माहीती तयार करुन **दिनांक १७-७-२०२० ला सकाळी ११ :०० वाजता** या कार्यालयास सादर करावी.

सदर्हू जबाबदारी संबधित कार्यालयाचे **सहाय्यक प्रशासन अधिकारी व कनिष्ठ प्रशासन अधिकारी व संबंधित लिपीक यांचेवर सोपविण्यात** येत आहे. त्यांनी त्यानुसार कार्यवाही करावी. यामध्ये कुठेही हयगय होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर बाब समुपदेशनाचे वेळेस निदर्शनास आल्यास याबाबतची जबाबदारी त्यांचेवर समप्रमाणात निश्चित करुन आवश्यकतेनुसार निलंबनाच्या कार्यवाहीसह गंभीर स्वरुपाची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**सहपत्र :-** वरील प्रमाणे

**(योगेश कुंभेजकर, भा.प्र.से.)**
अति **मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपूर**

**प्रतिलीपी :- (माहीतीस व योग्य कार्यवाहीस अग्रेषित.)**

१. गट विकास अधिकारी/गट शिक्षणाधिकारी, ,पंचायत समिती (सर्व)------------------
२. तालूका वैद्यकिय अधिकारी (सर्व)--------------------------------------------
३. वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र (सर्व)-----------------------------------

अति मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपुर